**-: प्रेस नोट :-** **दिनांक ०३/०७/२०२४**

**'' आंतरराज्यीय स्तरावर बेकायदेशीर शस्त्रांची विक्री करणाऱ्या टोळीच्या तीन गुन्हेगारांना मुंबई गुन्हे शाखेकडून अटक करून ०८ आधुनिक पिस्तूल व १३८ जिवंत काडतुसे जप्त ''**

..........................................................................................................

दिनांक ३०/०६/२०२४ रोजी जुहू पोलीस ठाण्याच्या हददीत एक इसम अग्निशस्त्र व जीवंत काडतुसे घेवून येणार असल्याबाबतची खात्रीलायक माहिती गुन्हे शाखा, कक्ष ९, मुंबई यांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. दया नायक यांना प्राप्त झाली. सदर प्राप्त झालेल्या विश्वसनिय माहितीच्या अनुषंगाने कक्ष ९ च्या पथकाने आय. एम.ए.हॉलचे समोर, पी.व्ही.आर चित्रपट गृहाजवळ, गुरुनानक रोड, साईनाथ नगर, म्हाडा कॉलनी, जुहू, मुंबई येथे सापळा रचून ०१ इसमांस शिताफीने ताब्यात घेतले. त्यांची अंगझडती घेतली असता त्याचेकडे खालील प्रमाणे अग्निशस्त्रे मिळून आली.

१. एक देशी बनावटीचे स्टेनलेस स्टीलचे पिस्टल
२. पिस्टलचे ०७ जिवंत काडतुसे.

या बाबत त्यांच्याकडे केलेल्या चौकशी मध्ये सदर अग्निशस्त्रे बाळगण्याचा कोणताही परवाना त्याच्याकडे नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे वर नमुद अग्निशस्त्रे व जिवंत काडतुसे जप्त करून आरोपींविरोधात गुन्हा क्र. ५२/२०२४ (जुहू पोलीस ठाणे गुरक्र. ५८२/२०२४ ) कलम ३, २५ शस्त्र अधिनियम सह कलम ३७(१)(अ) १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. त्यात त्याचेकडे केलेल्या चौकशी मध्ये त्याचे कडून पाच पिस्टल व १२१ जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली. तसेच नमुद गुन्हयामध्ये त्याचे ०२ साथीदार यांना सुध्दा अटक करून त्यांचेकडून प्रत्येकी ०१ असे ०२ अग्निशस्त्रे व १० जिवंत काडतुसे हस्तगत केली आहेत. असे एकुण तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. नमुद **तीनही आरोपींकडून एकुण ०८ अत्यंत आधुनिक पिस्तूल व १३८ जिवंत काडतुसे** हस्तगत करण्यात आली असून सदर गुन्हयाचा तपास कक्ष ९ कडून करण्यात येत आहे.

नमुद तीन अटक आरोपींना अटक करून मा. न्यायालयासमक्ष रिमांडकरिता हजर करण्यात आले असता मा. न्यायालयाच्या आदेशान्वये त्यांना दिनांक ०८/०७/२०२४ रोजी पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. कक्ष ९ ने केलेल्या कामगीरीमुळे सदर आरोपींकडून भविष्यात घडणाऱ्या अपराधांना प्रतिबंध करण्यात यश आले आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शशि कुमार मीना, मा. पोलीस उप-आयुक्त (प्र-१) श्री. विशाल ठाकूर, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डी/पश्चिम) श्री. राजेंद्र शिरतोडे यांच्या मागदर्शनाखाली कक्ष ९, यांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दया नायक, पोनि श्री. सचिन पुराणिक, पोनि श्री. दिपक पवार, सपोनि श्री. उत्कर्ष वझे, सपोनि श्री. महेंद्र पाटील, सपोनि श्रीराम घोडके, पोउपनि सुजित म्हैसधुने, स.फौ. नरेंद्र पालकर, स.फौ. संतोष काकडे, पो. ह. सुभाष शिंदे, सुनिल म्हाळसंक, जितेंद्र शिंदे, भिकाजी खडपकर, दुष्यंत कोळी, दत्तात्रय कोळी, सचिन राऊत, संतोष लोखंडे, राहुल पवार, विनय चौगुले, प्रशांत भुमकर, अमोल सोनावणे, शार्दुल बनसोडे, राकेश कदम, गितेश कदम, सुशांत गवते, पो. ह. चा. विनायक परब, अविनाश झोडगे, शशिकांत निकम मपोशि साधना सावंत, प्राजक्ता धुमाळ यांनी पार पाडली आहे.